Literacy for a Billion

Movie: Jotibacha Navas
Year: 1975

Song: Bai Hya Pavhnyala Lajch Nahi
Lyricist: Jagdish Khebudkar

हो...
लई उतावळा सभाव हयाचा
कोणाचा
हो...
लई उतावळा सभाव हयाचा
अन् जिथं तिथं ही घाई
आगं पर कुनाची
लई उतावळा सभाव हयाचा
अन् जिथं तिथं ही घाई
हो घाई हो घाई
बाई हया पाव्हन्याला
पाव्हन्याला लाजच न्हाई
बाई हया पाव्हन्याला
पाव्हन्याला लाजच न्हाई
बाई हया पाव्हन्याला
पाव्हन्याला लाजच न्हाई
बाई हया पाव्हन्याला

खिसा रिकामा घेऊन येतो
आसं
खेळ फुकट बघून घेतो
बरंच हाई की
खिसा रिकामा घेऊन येतो
खेळ फुकट बघून घेतो
भाडयाला पैसं उसनं मागून
परत घराला जाई
हयॅ... हयॅ... बघ की
भाडयाला पैसं उसनं मागून
परत घराला जाई

हो जाई हो जाई
बाई हया फुकटयाला
आरं फुकटयाला लाजच न्हाई
हया हया नाकटयाला
आहो नाकटयाला लाजच न्हाई
बाई हया पाव्हन्याला
हया पाव्हन्याला लाजच न्हाई
बाई हया पाव्हन्याला

चिकूमारवाडी म्हणती हयाला
म्हणू दे
काय गं देतोय देणेकऱ्याला
देऊ दे
चिकूमारवाडी म्हणती हयाला
काय गं देतोय देणेकऱ्याला
शेजारणीशी भांडाण करतो
शिव्या फुकटच्या खाई
आसं व्हय
व्हय तर
शेजारणीशी भांडाण करतो
शिव्या फुकटच्या खाई
हो खाई हो खाई
बाई हया पावटयाला
हो पावटयाला लाजच न्हाई
हया हया भामटयाला
हो भामटयाला लाजच न्हाई
बाई हया पाव्हन्याला
पाव्हन्याला लाजच न्हाई
बाई हया पाव्हन्याला

Literacy for a Billion

हयाच्या अंगात
अंगात छप्पन खोडया
हयाच्या अंगात छप्पन खोडया
कुनी पकडून पकडून
ठोका बेडया
हयाला पकडून ठोका बेडया
सोंगाडया गंमती करून
वरती नामानिराळा न्हाई
हे हाय रं गबरू

तर काय
सोंगाडया गंमती करून
वरती नामानिराळा न्हाई
हो न्हाई हो न्हाई
पट्टेवाल्याला जनाची लाजच न्हाई
बिल्लेवाल्याला मनाची लाजच न्हाई
हया हया पाव्हन्याला
हो पाव्हन्याला लाजच न्हाई
बाई हया पाव्हन्याला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*